करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

# साप्ताहिक कमलाभवानी संदेश

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com |

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक १४५ | पाने-१२ | दि.२९/९/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
9822058106




# बाजार समितीच्या सभापती पदी पुन्हा एकदा जयवंतराव जगताप - उपसभापती पदी महिलांना संधीची शक्यता



करमाळा(सं.प्र.) : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक बिनविरोध झाली असून सभापती पदाची निवडणूकही बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावेळी पुन्हा एकदा बाजार समितीचे माजी सभापती व माजी आमदार जयवंतराव जगताप हे सभापती होणार असून उपसभापती पद यावेळी महिला सदस्यांना मिळण्याची शक्यता आहे.

सभापती व उपसभापतीची निवडणूक ही लवकरच होणार असून सभापती पदी पुन्हा एकदा जयवंतराव जगताप हेच बिनविरोध सभापती होणार असल्याचे बोलले जाते. सन २०१८ मध्ये झालेल्या बाजार समितीच्या निवडणुकीत पाटील गटाचे सदस्य प्रा.शिवाजीराव बंडगर यांनी ऐनवेळी बागल गटात प्रवेश केल्याने जगताप गटाची सत्ता खंडीत होऊन श्री.जगताप यांची सभापती पदाची संधी हुकली होती. नुकतीच बाजार (पान नं.३ वर..)

## जयवंतराव जगताप यांची प्रकृती उत्तम

माजी आमदार जयवंतराव जगताप यांना नुकताच शारिरीक त्रास झाला होता. त्यामुळे त्यांचेवर बार्शी येथे खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. आता त्यांची प्रकृती उत्तम असून कोणतीही काळजी करण्याचे कारण नाही असे डॉक्टरांनी सांगितले आहे. तुर्त श्री.जगताप यांना विश्रांतीचा सल्ला दिला असल्याने नागरीकांनी गर्दी करू नये; असे आवाहन जगताप गटा तर्फे करण्यात आले आहे. श्री.जगताप यांना गुरूवारी सायंकाळी अस्वस्थ वाटल्याने त्यांना करमाळा येथील खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्यांना बार्शी येथे उपचारासाठी दाखल केले आहे. बार्शी येथे शुक्रवारी नागरीकांनी गर्दी केली होती. आमदार राजेंद्र राऊत, आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार नारायण पाटील यांचेसह जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी श्री.जगताप यांची भेट घेऊन विचारपूस केली आहे. जगताप गटातर्फे निवेदन प्रसिध्दीस देण्यात आले असून माझ्यावर योग्य ते उपचार सुरु असून आपल्या अशिर्वादामुळे माझ्या प्रकृती उत्तम आहे. डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला आहे. त्यामुळे बार्शी येथे येऊन कोणीही गर्दी करू नये. आपले प्रेम, आपुलकी व जिव्हाळा मी समजू शकतो. मी लवकरच बरा होऊन आपल्या सेवेसाठी हजर राहिल; अशा आशयाचे निवेदन श्री.जगताप यांनी केले आहे.



का जगायच हे समजलं म्हणजे अनावश्यक त्रास,वेळ व मनस्ताप वाचेल....!

## संपादकीय.........................................!

# का.. जगायचं ?

प्रत्येक माणसाला जगायचं असतं, खुप जगायचं असतं पण तो जगू शकत नाही. त्याची वेळ आली की त्याला जावेच लागते. रोज आपण बातम्या वाचतो... अमूक अमूक झोपले पण सकाळी उठलेच नाही. अमूक अमूक देवाला गेले पण येतानाच अपघात झाला व त्यात ते गेले. वेगवेगळ्या बातम्या येतात, त्यात वेगवेगळ्या कारणांनी माणसं जातात. कारण वेगळे असलेतरी त्याचा परिणाम एकच यहलोक सोडणे. शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत असणारी माणसं मी पाहिली आहेत. काम करता करता जातात, ते जगण्यात यशस्वी झाले का..? मंगेश पाडगावकर म्हणतात... "आयुष्य हे विधात्याच्या वहीतलं पान असतं... रिकाम तर रिकाम लिहलं तर छान असतं... शेवटचं पान मृत्यू अन् पहिलं पान जन्म असतं... मधली पानं आपणच भरायची कारण ते आपलं कर्म असतं."

यात एक क्ल्यू दिला आहे. म्हणजे जो जन्माला आला तो जाणारच... माऊली ज्ञानोबाराया म्हणतात..."उपजे ते नाशे। नाशे ते पुनरपी दिसे। हे घटीका यंत्र जैसे। परिभ्रमे गा।।" ज्याला जन्म आहे, त्याला मरण ठरले आहे. ही पहिली गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. जे मोजता येते ते संपणार आहे. मग ते वय असो नाहीतर नोटा. त्यामुळे जगण कुठपर्यंत..? मरण येई पर्यंत.. हे एकदा समजले म्हणजे जादा विचार करण्याची गरज नाही.म्हणजे आपण जाणार आहोत, हे नक्की आहे, तर कधी का जाईना पण त्याची मनापासून तयारी पाहिजे. कारण तुम्ही तयारी केली काय किंव्हा नाही केली काय जावेतर लागणार आहे. म्हणजे आता मधल्या अंतरात जे जगणं आहे, ते नेमके कशासाठी ? याचा विचार झाला पाहिजे. लहानपणी बहुतेकांनी गारीगार खाल्ली आहे. गारीगारीची कांडी आपण खाल्ली किंवा नाही खाल्ली तरी तीचे १५-२० मिनीटांत पाणी होणार हे घेणाराला अगदी लहानात लहान मुलाला माहित असते. त्यामुळे तो त्या गारीगारीचे पाणी जिभेने ओढतो व त्यात आनंद घेतो.शेवटी हातात काडी राहते तेंव्हा तो मुलगा रडून काडी फेकत नाहीतर हासून काडी खाली फेकतो कारण त्याने त्या गारीगारीचा पुरेपूर वापर केल्याने त्याला दुःख झालेले नसते. तसेच जगण्यातील आनंद पुरेपूर घेतला तर देह (काडी) अनंतात विलीन झालातरी त्याचे दुःख वाटणार नाही.

पण मोठी गंमत आहे. देवाने माणसाला सर्वात प्रगत प्राणी बनवले आहे पण या माणसालाच आपण कसे जगावे किंवा कशासाठी जगायचे हे समजत नाही. माणसाने अनेक संशोधनं केली त्यामुळे जगणं सुसाह्य झाले, साधनामुळे त्रास कमी झाला व सुविधा मिळाल्या पण त्यातून सुख मिळवण्याची कला अजुनही माणसाला प्राप्त झालेली नाही. सुखाच्या शोधात तो मैलन् मैल चालतो पण पुन्हा तो पुर्वीच्याच जागेवर अपोआप आलेला असतो. माणसाकडे बुध्दी असूनही त्याची बुध्दी कंठीत होते. माणसाने स्वतःच्या विचारानेच त्याच्या भोवती कोळ्या प्रमाणे जाळे विणून तो त्यात गुंतला आहे. सुखासाठी पैसा कमवायचा म्हणताना तो साधनात गुंतून पडतो. घरासाठी लाखो रूपये घालवतो, पुन्हा पुन्हा त्यातील फर्नीचर व वस्तु घेण्यासाठी तो पैशाचा हव्यास करतो, दारात चार चाकी, किंवा दुचाकी पाहिजे, समाजात प्रतिष्ठा पाहिजे मग त्यासाठी जेवणावळी, किंवा वेगवेगळे समारंभ करतो, तर कधी पैसे मिळावेत म्हणून देवाचा जागरण- गोंधळ, आरदखाना, नवसाची बोकडं कापतो, कधी कधी बुवाच्या नादी लागून नको त्यासाठी हजारो रूपये खर्च करतो पण शेवटी हातात काय पडते..? नुकसान.टॉलस्टॉयची कथा माहित आहे,की.. सुखासाठी जादा जमीन मिळावी म्हणून दिवसभर धावत असलेला माणूस फक्त सहा फुट जागा घेतो व तिथेच तो माती आड जातो. म्हणजे माणसाची गल्लत झाली आहे. त्याला त्याचं जगणं म्हणजे फक्त पैशा कमवण्यासाठीच आहे , असे वाटते व त्यामुळे त्याला जास्त दुःख होते. आपण गारीगारचे उदाहरण पाहिले, आता खिसलेल्या बर्फाचे गोळेसुध्दा काडीला लावून त्यावर साखरेच्या कलरचे पाणी मारले जाते. मग तो गोळा दिसायला आकर्षक होतो. पण गमंत अशी की गारीगार ही काडीला शेवटपर्यंत घट्ट चिकटलेली असते पण खिसलेला गोळा हा जास्त काळ टिकत नाही. त्यासाठी गोळा पडू नये म्हणून गोळ्या खाली वाटी धरली जाते. एका मुलांने वाटी बरोबर नेली नव्हती. त्याला वाटले आपण बर्फाचा गोळा घेऊ व पळत पळत घरी येवून खाऊ. पण झाले उलटेच, तो जसा पळत आला तसा थोडासा हिसका बसला आणि बर्फाचा कलर मारलेला संपुर्ण गोळा खाली पडला. त्या मुलाला मोठे दुःख वाटले कारण त्या गोळ्याचा काहीच उपभोग घेतला नव्हता. बऱ्याच वेळा अनेक माणसाचे असेच होते. तो फक्त धावत पळत असतो. फक्त पैशासाठी आणि पैसे मिळवता मिळवता तो कधी संपतो हे त्याला समजत नाही. शेवटी त्याला आपला जन्म व्यर्थ गेला असे वाटते. त्यामुळे जगणाच्या उद्दीष्ट एकदा ठरले,की माणसाला दिशा कळते. त्या दिशेने तो जात राहिले व पाहिजे ते मिळाले, की त्या व्यक्तीला जगण्याचे सार्थक झाले वाटते. संतपरंपरेतील अनेक संत आहेत. त्यांचे उद्दीष्ट देव प्राप्त करणे हे होते. ज्यांना देव मिळाले त्यांना जगण्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले. छत्रपती शिवरायाच्या सोबत अनेक मावळे होते.त्यातले काही शिपाई, काही सरदार काही सेनापती पण प्रत्येकजण स्वराज्यासाठी लढत होता, लढता लढता तो धारातिर्थी पडला तर त्याचे दुःख त्याला तर नव्हतेच पण परिवारालाही नव्हते कारण तो धर्मासाठी, स्वराज्यासाठी गेला हे समाधान होते. स्वातंत्र्य संग्रामात अनेकजण फासावर गेले तर काहीजण गोळ्याने गेले पण त्यांना देशासाठी मरण आले व तेच त्यांचे उद्दीष्ट होते, त्याचा त्यांना आनंद होता.

आता काळ बदलला म्हणून जगण्याला काहीच उद्दीष्ट नाही का..? जरूर आहे. एका महिलेने दारात पाच कुंड्या आणल्या. त्यात तीने वेगवेगळ्या रंगाची गुलाबाची रोपे आणली व लावली. दररोज त्या रोपांची ती काळजी घेत असे. त्याला खत घालणे, पाणी देणे, सुर्यप्रकाशत ठेवणे आणि एक दिवस एका कुंडीतील रोपला कळी आली. ती खुष झाली. दोन दिवसात कळी खुल्ली आणि त्यातून मोठा गुलाब आकाराला आला. त्या महिलेला खुप आनंद झाला. या आनंदाला किंमतही नाही व शब्दही नाहीत पण तीचे उद्दीष्ट पुर्ण झाले.जगण्याला फार मोठे उद्दीष्ट लागते असे नाहीपण जे असेल त्यातून आनंद मिळवता आला पाहिजे. यात प्रत्येकाचे वेगवेगळे धोरण व ध्येह असू शकते. एक गरीब मुलगा होता, त्यांने दारीद्र्याचे चटके भोगले. त्याला श्रीमंत व्हायचे होते. त्यांने मेहनत घेतली, श्रीमंतीचे स्वप्न पाहिले व १५ वर्षात तो शहरात श्रीमंत झाला. त्याच्या जगण्याचा त्याला आनंद झाला. एक गरीब परिवारात जन्मला पण त्याला जिल्हाधिकारी व्हायचे होते, त्याने प्रयत्न केला व ते यश मिळवले. जगण्याचे सार्थक झाले. इथ पर्यंत स्वप्न पुर्ण होणे याचा आनंद आहे पण त्यानंतर म्हणजे श्रीमंत झाल्यावर पद मिळाल्यावर त्याचा विनीयोग कसा करायचा हे ज्याला समजते, त्याचे जगणे श्रेष्ट ठरते, किंबहुना जगण्याचे सार्थक होते. किंवा त्यासाठीच जगणे म्हणतात. अन्यथा गरीबीतून सत्तेत आला व भ्रष्टाचार केला, गरीबीतून जिल्हाधिकारी झाला, जिल्हा अभियंता झाला अन् भ्रष्टाचारकरू लागलातर ते जगणं जगणं रहात नसते.खरं जगण तिथंच सुरू असते. तुमच्याकडे काय आहे यापेक्षा जे आहे, त्यातून इतरांची काळजी केली जाते, त्या जगण्याला खरं जगणं म्हणतात. म्हणूनच दत्ता हासलगीकर म्हणतात.. ज्याची बागल फुलून आली त्यांनी दोन फुले द्यावीत, ज्याचे सुर जुळून आली त्यांनी दोन गाणी गावीत ... थोडक्यात जगण म्हणजे मरे पर्यंत पैसा कमवणे नव्हे, पैसा पाहिजेच पण मिळवलेला पैसा योग्य ठिकाणी जातो का हे जो पाहतो व त्याचा योग्य विनीयोग करतो तसेच आपल्या मनातील छंदासाठी जो वेळ काढून ते पुर्ण करतो, त्याचं जगणं श्रेष्ट ठरतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात... जर तुमच्याकडे दोन रूपये असतील तर तुम्ही एक रूपयाची भाकरी घ्या व एक रूपयाचे पुस्तक घ्या, कारण भाकरी तुम्हाला जगण्यास मदत करेलतर पुस्तक तुम्हाला कसं जगायचं हे शिकवेल थोडक्यात कसं जगायचं यासाठी वाचनाची गरज आहे. त्यातूनच माणसाला जगण्याची दिशा समजते व एकदा का दिशा समजली की त्याचे जगण्याचे गाव त्याला भेटल्याशिवाय राहणार नाही.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

पान १ वरून पुढे...

## बाजार समितीच्या सभापती पदी पुन्हा एकदा जयवंतराव जगताप

समितीची झालेली निवडणूक ही बिनविरोध झाली असून यात जगताप गटाचे बहुमत आहे. त्यामुळे स्वत: श्री.जगताप सभापती पदी विराजमान होतील ; असा अंदाज व्यक्त केला जात आहे. याबरोबरच जगताप यांचे चिरंजीव व खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंभुराजे जगताप यांनाही श्री.जगताप यांनी ठरविल्यास सभापती पदाची संधी मिळू शकते. उपसभापती पदासाठी यावेळी महिलांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे. त्यानुसार शैलजा मेहेर यांचे नाव आघाडीवर असून साधना पवार यांनाही उपसभापती पदाची संधी मिळू शकते. महिलांना संधी दिली नाहीतर जगताप गटाचे जुने सहकारी महादेव कामटे, रामदास गुंडगिरे यांना उपसभापती पदाची संधी मिळू शकते. या चर्चा असल्यातरी निवडीचे सर्वाधिकार माजी आमदार जयवंतराव जगताप यांचेकडे असल्याने ते नेमकी कोणाला संधी देतात याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

## करमाळा तालुक्यातील दिव्यांगांना कृत्रिम अवयव व साहित्य वाटप

करमाळा(सं.प्र.) : केंद्र शासन (एलिम्को), जिल्हापरिषद सोलापूर समाजकल्याण विभाग, शिवरत्न शिक्षण संस्था अकलुज, श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट अकलुज व डॉर्टस मॉम्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय वयोश्री व ए.डी.आय.पी. योजने अंतर्गत आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार दिव्यांग व ज्येष्ठ नागरीकांसाठी उपजिल्हा रूग्णालय करमाळा येथे काही महिन्यांपूर्वी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात तपासणी केलेल्या दिव्यांगांना कृत्रिम अवयव व साहित्याचे वाटप करण्यात आले. कंदर येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमास मित्राचे सीईओ प्रविणसिंह परदेशी, माजी आमदार नारायण पाटील, भाजपाचे धैर्यशील मोहिते-पाटील, मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल, गटविकास अधिकारी मनोज राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले, की केंद्र सरकारच्या वतीने दिव्यांगासाठी जनकल्याणाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. त्याच पध्दतीने ग्रामीण भागातील युवकांसाठी असलेल्या योजना देखील राबविणे आवश्यक आहे. त्यानूसार भविष्यात कृषी पुरक प्रक्रिया उद्योग सुरू करण्याचे आवाहन केले.

यावेळी प्रविणसिंह परदेशी यांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केलेल्या मागणीनुसार युवकांच्या कृषीपुरक प्रक्रिया उद्योगांसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रम प्रसंगी भारतनाना पाटील, माजी सरपंच अजित तळेकर, डॉ.अमोल घाडगे, भाजपाचे तालुका सरचिटणीस अमरजित साळुंके, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, आदिनाथचे संचालक नानासाहेब लोकरे, महेंद्र पाटील, शिवशंकर माने, राजकुमार सरडे, मौला मुलाणी, विजय नवले, एलिम्को संस्थेच्या रोहिणी कारंडे, मेहंक मेहता, विभुती साहू यांचेसह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## राशिनपेठ येथे आरोग्य, रक्तदान, नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबीर संपन्न




करमाळा(सं.प्र.): राशिनपेठ तरूण सेवा मंडळ व शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष यांचे संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य, रक्तदान, नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी प्रियंकाताई आंबेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे यांचे हस्ते शुभहस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख मंगेश चिवटे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. या शिबीरात करमाळा शहरातील सर्व डॉक्टर्स उपस्थित होते. तसेच नगर, पुणे, बार्शी येथील डॉक्टरांकडून ईसीजी, शुगर, नेत्र व कॅन्सर इ. आरोग्यविषयक तपासण्या मोफत करण्यात आल्या. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, अनिल वाशिंबेकर, दिपक पाटणे, जगदीश आगरवाल, भाजपाचे गणेश चिवटे, युवा उद्योजक प्रकाश पाटील, जयदीप किरवे यांचेसह मंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचालन विनायक चिवटे यांनी केले.

## उमरड जि.प.शाळेचा 'आदर्श शाळा' पुरस्काराने सन्मान



करमाळा(सं.प्र.): राष्ट्रमाता जिजाऊ प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरड या शाळेस 'आदर्श शाळा' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे वितरण गटविकास अधिकारी मनोज राऊत यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी पतसंस्थेचे संस्थापक प्रताप काळे, चेअरमन दयानंद चौधरी, तालुका सोसायटीचे चेअरमन नवनाथ ससाणे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख घोलप, निशांत खारगे आदी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार शाळेचे मुख्याध्यापक सिताराम भिल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय कोठावळे यांनी स्विकारला. यावेळी केंद्रप्रमुख अमृत सोनवणे, चांगदेव कोठावळे, मुकुंद राऊत, बापूसाहेब चोरमले, अनिल यादव उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवणे, विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन करणे, उत्कृष्ट शाळा सजावट व परिसर सजावट करणे, स्वच्छ शाळा - सुंदर शाळा अभियान राबविणे यासारखे उपक्रम शाळा सातत्याने राबवित आहे. पतसंस्थेच्या वतीने शाळेस आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याने सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे प्रतिनिधी यांनी शाळेचे अभिनंदन केले आहे.

## केम येथे रक्तदान शिबीर - १२२ रक्तदात्यांचा सहभाग



करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा सोलापूर ग्रामीण यांचे वतीने व जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप यांच्या पुढाकाराने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त केम येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीरात तब्बल १२२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. या शिबीराचे उद्घाटन केम येथील भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व ग्रामस्थांच्या हस्ते झाले. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप यांचेसह सागरराजे दोंड, विष्णूदादा पारखे, दिलीपनाना दोंड, तानाजी दोंड, आनंद शिंदे, कांतीलाल दोंड, बाळासाहेब देवकर, गोरख तळेकर, विलास बिचितकर, किरण तळेकर, दयानंद तळेकर, बापू घाडगे, रघुनाथ सावंत, गणेश तळेकर, बाळासाहेब तळेकर, धनंजय ताकमोगे, विकास कळसाईत, निलेश तळेकर, राजेश दुर्गूळे, संतोष गलांडे यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.






# क्षेत्र फक्त साडेतीन एकर, कमाई मात्र १५ एकराची !

करमाळा : शेती परवडत नाही.. हे खरं, पण शेती परवडते हे ही खरं. तुम्ही कोणत्या मार्गावरून जाता त्यावरून तुम्ही त्या ठिकाणी पोहचता. अगदी तसंच शेती फायद्यात करायची असेलतर तुम्हाला त्याच मार्गावरून जावे लागते. अगदी तसंच.. सर्व मार्ग सोडून शेती फायद्यात पडावी म्हणून पोथरे येथील शेतकरी महादेव शिंदे यांनी भाजीपाला शेती सुरू करून चक्क साडेतीन एकर शेतीतून जवळपास १५ एकर शेती एवढे उत्पन्न काढतात.

पोथरे हे गाव पुर्वी मांगी तलावातून बागायत असणारे तालुक्यातील महत्वाचे गाव होते. काळाच्या ओघात मांगी तलावाचे पाणी थांबले व पोथरे येथील शेतकरी देशोधडीला लागले. गावात प्यायला पाणी नव्हते, अनेकजण कामापुरती शेती करत होते तर काहीजण शेतीला पुरक व्यवसाय करू लागले. अशाच कालावधीत महादेव शिंदे यांना वाटपाने दोन ठिकाणची सात एकर शेती मिळाली. एक माळरानावर तर दुसरी सपाटी भागात. दोन्ही जमीनी जिरायत. त्यांनी सुरूवातीला मजुरी करून काही रक्कम जमा केली व एक बोअर घेतला. त्यातून त्यांनी सपाटी भागातील जमीन बागायत केली. तिथे ऊस लावला, सोबत दुधाचा व्यवसाय सुरू केला. पण जनावरांची व्यवस्था आणि शेतीची मेहनत एकत्र जमेना. ऊसाच्या पीकातून पुरेसे उत्पन्न मिळेना. पण त्यांनी मेहनत कमी केली नाही, आणखीन एक बोअर घेतला आणि इतर पीकांचा विचार केला.

मग श्री.शिंदे यांनी शेती फायद्यात आणण्यासाठी भाजीपाला शेतीवर लक्ष केंद्रीत केले. अगोदर थोडा थोडा भाजीपाला करू लागले. कांदा, वांगी, काकडी, भोपळा, दोडका अशी पीके घ्यायला सुरूवात केली. कमी उत्पन्नाला करमाळा येथे भाव मिळत असे, नाही तर तोट्यात जात असे, पण हार मानणारे महादेव शिंदे नाहीत. त्यांनी मग पोपईचे पीक घेतले आणि त्यासाठी बाहेरचे व्यापारी बोलावले.



## महादेव शिंदे यांची वेगळी वाट

पोपईने साथ दिली. मग त्यांनी टोमॅटोचे पीक घेतले आणि मग त्यांनी गॅलन जातीचे वांगे लावले. त्याला मार्केट शोधले. सुरूवातीला ट्रान्सपोर्टने माल पाठवला जात असे, पण तो योग्यवेळी पोहचवला जात नसे. भाडेपण जास्त घेतले जात असे. मग त्याला पर्याय म्हणून त्यांनी स्वत:च पीकअप घेतला आणि स्वत:च मुंबई येथील वाशी मार्केटला माल घेऊन जावू लागले. वेळेवर माल जावू लागला व भावही चांगला मिळाला. त्यांनी मग वांगी व त्यात ४५ दिवसात येणारी काकडी लागवड सुरू केली. डबल पीक जोमदार येवू लागले आणि भावही चांगला मिळू लागला. त्यांनी माळावरील शेती बागायत करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला यश आले नाही. त्यांनी साडेतीन एकरामधील एक एकरात वांगे-काकडी, एक एकरात तुतीची झाडे लावून रेशीम उद्योग सुरू केला आहे. तर उर्वरीत क्षेत्रात लिंबोणी आहे.

त्यांच्या या कार्यासाठी पत्नी सौ.हिराबाई यांचा मोठा सहभाग आहे. त्यांना एकुलता एक मुलगा बाळकृष्ण हा असून त्याची नुकतीच पोलीस खात्यात निवड झाली आहे. तर सुन मोनिका ही या परिवारात मनापासून रमली असून तिलाही शेतीची मोठी आवड आहे. त्यांना रूपाली, दिपाली व माधुरी अशा तीन मुली असून रूपाली हिस वीट (ता.करमाळा) येथे, दिपाली हिस वडगाव तनपुरा (ता.कर्जत) तर माधुरी हिस नातेपुते येथे दिले आहेत. तिघीही मुली आपल्या संसारात रमलेल्या आहेत.

महादेवराव यांची सकाळ साडेपाच वाजता सुरू होते. सुर्योदयापुर्वीच ते कमीत कमी एक एकर क्षेत्राची फवारणी करतात. त्यानंतर इतर कामे पाहून साडेनऊ वाजता जेवण, पुन्हा दिवसभर शेतातील वेगवेगळ्या कामावर लक्ष केंद्रीत करतात. दुपारी तीन वाजल्यापासून लिंबू तोडण्याचे काम करतात. परिवारातील सर्वजण हाती पडेल ते काम करतात. भाजीपाला, लिंबोणी व रेशीम उद्योग यात हा शिंदे परिवार रमून गेला आहे. एवढेच नाहीतर प्रति एकरी साडेतीन ते चार लाखाचे उत्पन्न ते सहज मिळवतात. त्यांच्या मेहनतीने इतर शेतकऱ्याच्या १५ एकर क्षेत्रातील उत्पन्नाएवढे ते साडेतीन एकरात उत्पन्न काढतात. यामागे मेहनत, कल्पकता व मार्केटींग हे महत्वाचे आहे. प्रत्येक शेतकऱ्याने बाजारपेठ पाहून पिके केल्यास शेती परवडते; असे मत महादेव शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

## डरपोक मित्र

बोधकथा

खूप वर्षापूर्वीची गोष्ट आहे. एक चोर दोन मित्रांवर हल्ला करतो. त्यातील एक मित्र जीव वाचविण्यासाठी पळून जाऊन लपून बसतो. पण दुसरा शोध मित्र चोरट्याचा मुकाबला करतो आणि त्याला जखमी करून निशस्त्र करतो. हे पाहून डरपोक मित्र परत येतो. तिथे जवळ पडलेले लाकूड असते. ते उचलतो आणि चोराला म्हणतो.. 'थांब आता मी तुला माझी बहादुरी दाखवतो.' त्याला माहित होते की चोर आता त्याला काही करू शकणार नव्हता. त्यावेळी त्याचा शुर मित्र त्याला म्हणाला, "तु आता शौर्याचे नाटकं करू नकोस व दुसऱ्याला मुर्ख बनवू नकोस. मला तुझे खरे रूप समजले आहे. तु मगाच माझ्यासोबत राहून मला मदत करावयास हवी होती. परंतु तु तुझा जीव वाचवून पळून गेलास. खरंतर संकटसमयी तुझ्या सारख्या माणसांवर विश्वास ठेवला जावू शकत नाही !" हे ऐकून भित्रा मित्र खाली मान घालून निघून गेला.

**तात्पर्य : विश्वासाला कधीही तडा जावू देवू नका !**

## सुभाषित..

- संस्कार व विकास जो मिळवतो तो मनुष्य आणि जो मिळवत नाही तो पशु.
- सुखात तर वाटेकरी सर्वच असतात, पण दु:खात जे वाटेकरी असतात ते खरे मित्र असतात.
- पशुंना धनाची इच्छा नसते, पण माणसाला तीच इच्छा पशु बनवते.

## विनोद

### एक्सचेंज ऑफर

मोठ्या बोर्डावर तरूणीने हातात मिक्सर घेतलेले चित्र होते आणि लिहिले होते.. 'एक्सचेंज ऑफर' !
रामभाऊ बराच वेळ ते बघत होते. ते बघून काकू ओरडल्या... 'चलाऽऽ ऑफर फक्त मिक्सरची आहे' !

### उत्तर

बंड्या रडतऽऽरडत घरी आला.
बाबाने विचारले.. 'काय झाले बंड्या ?
बंड्या : 'मास्तरांनी मला मारले.
बाबा : 'काहीतरी अगावगिरी केली असशील !
बंड्या : 'नाही बाबा.. मास्तरांनी प्रश्न विचारला की तीन लिंगे कोणती ?'
बाबा : 'मग तु काय म्हणालास ?'
बंड्या : 'पुल्लींग, स्त्रीलिंग व नपुसलिंग'
बाबा : 'बरोबर आहे, मग का मारलं ?'
बंड्या : 'मास्तरांनी उदाहरण विचारले.'
बाबा : 'तु काय म्हणालास ?'
बंड्या : 'तो फळा, ती शाळा आणि ते मास्तर !'

### फरक

सांग बरं.. 'परदेशी नवरे' आणि 'भारतीय नवरे' यात फरक काय?
उत्तर : 'परदेशी नवरे बायकोने केलेला स्वयंपाक काट्याने खातात आणि भारतीय नवरे मुकाट्याने खातात !'

# शिक्षण पाहिलं आणि लग्न जमलं..

## नवरा माझा नवसाचा



लग्न म्हटलं की प्रत्येक मुलीच्या जीवनात फार महत्वाचा प्रसंग असतो. या प्रसंगी निर्णय योग्य झाला की आयुष्य सुखात जातं आणि निर्णय चुकला की आयुष्याची वाट लागते. मी एफ.वाय.बी.ए. च्या वर्गात परांडा येथील न्यु कॉलेज मध्ये शिक्षण घेत होते. मला तर तशी लग्नाची घाई नव्हती, पण आई आणि वडील दोघेही शिक्षक आणि त्यांचे जे संस्कार होते ते म्हणजे मोठ्यांचा आदर करणे. त्यानूसार पाहूण्यांनी स्थळ आणलं आणि घरामध्ये चर्चा सुरू झाली. त्यातली त्यात माझ्या आईने बार्शीचे मनोज पद्माळे यांना एका लग्नात पाहिलं. सहज चौकशी केली तर मुलगा एम.एस्सी झालेला, दिसायला सुंदर आणि वागणंही अतिशय समजुतदारपणाच ! त्यामुळे आईने या स्थळावरती लक्ष केंद्रीत केलं.

इकडं-तिकडंन चौकशी केली, स्थळ चांगलं आहे हे लक्षात आल्यावर आई आणि वडीलांनी दोघांनी ठाम निर्णय घेतला आणि एके दिवशी मला याबाबत सांगितले. खरंतर त्यावेळी काय बोलावं हे समजत नव्हतं. पण हो.. म्हणणही अवघड कारण मला शिकायचं होतं. नाही म्हणणंही कठीण कारण आई-वडीलांचा विश्वास तोडण्यासारखं होतं. त्यामुळे मी माझा निर्णय फक्त शांत राहणे हाच घेतला आणि त्यातून आमचं लग्न जमलं. विशेष म्हणजे आमची पत्रिका जुळली नाही, पण लग्न मात्र ठरलं.

सर्वांच्या सोयीसाठी बार्शी ठिकाण ठरवलं आणि आमचं लग्न मोठ्या उत्साहात संपन्न झालं. ना देणं ना घेणं ना अपेक्षा ना रूसवा ना फुगवा ! अतिशय उत्साहात लग्नं झालं आणि आमचा संसार सुरू झाला. माझं लग्न झालं त्यावेळी माझे पती खाजगी कंपनीत नोकरीला होते. लग्नानंतर दोन वर्षातच राज्य शासनाच्या आरोग्य विभागात प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदावर नोकरी लागली. सुरूवातीला दोन वर्षे मी बार्शीतच राहत होते. माझ्या पतींना शासकीय नोकरी मिळाली आणि त्यांचं पहिलं पोस्टींग करमाळा येथील कुटीर रूग्णालयात झालं. त्यानंतर आम्ही दोघं इथंच म्हणजे करमाळ्यात रहायला आलो.

माझं लग्न १९९८ ला झालं असलंतरी माझ्यापेक्षाही माझ्या पतीची माझं शिक्षण व्हावं, ही इच्छा असल्याने त्यांनी माझ्या पाठीशी लागून महाविद्यालयातील प्रवेश कायम ठेवला.

दि.१/२/१९९८ ला माझ्या आई-वडीलांनी अभ्यासाला लागणारी पुस्तकं आणून दिली. अभ्यासाला वेळही मिळवून दिला आणि परीक्षेच्या दर पेपरला परीक्षा केंद्रावर सोडण्याचं कामही केलं. त्यातून मी बी.ए झाले, दरम्यान माझी मोठी मुलगी सायली हिचा जन्म झाला होता. आई म्हणून मुलांना न्याय देणं हे कर्तव्य समजून मी स्वत:च शिक्षणाला स्वल्पविराम दिला. सायली नंतर २००३ ला सानिकाचा जन्म झाला. दरम्यान या दोघी मुली खेळायला लागल्यानंतर पुन्हा २००६-०७ मध्ये मी कुर्डूवाडी येथून एस.एन.डी.टी. विद्यापीठातून बी.एड केले. त्यानंतर मी सोलापूर विद्यापीठातून इतिहास घेऊन एम.ए. पूर्ण केलं. त्याच दरम्यान सन २००८ ला हर्षवर्धन याचा जन्म झाला.

माझा बी.ए. व बी.एड चा विषय हा इंग्रजी असल्याने करमाळा येथील सन २००८ पासून पद्माळे इंग्लीश क्लासेस सुरू केले आणि मी विद्यार्थ्यात रमून गेले. माझी मुलं आणि क्लासची मुलं, त्यात संसार अशी मोठी कसरतही होती आणि गंमतही होती. तरीही सन २०१८ ला माझ्या पतीच्या मार्गदर्शनानूसार मी एलएल.बी. ला प्रवेश घेतला आणि २०२१ ला फर्स्ट क्लास (डिस्टींक्शन)मध्ये एलएल.बी. दयायनंद लॉ कॉलेज सोलापूर मधून पदवी मिळवली आणि त्यानंतर सनदही मिळवून करमाळा येथे सध्या वकिली व्यवसाय करत आहे.

माझे पती हे केवळ पती नसून ते मित्र म्हणूनच माझ्याशी वागत असतात. त्यांचे मला जेवढे प्रोत्साहन आहे तेवढाच विश्वासही आहे. संसारामध्ये विश्वास फार महत्वाचा असतो. त्याचबरोबर जोडीदाराला समजून घेणे हेही महत्वाचे असते. त्या दोन्ही बाबी मला प्राप्त झाल्याने मी संसारात खूपच समाधानी आहे.



मागे वळून पाहताना माझ्या आई-वडीलांचा जो निर्णय होता तो निश्चितच योग्य होता हे मला आज २५ व्या वर्षातही मान्यच करावे लागते. आज २५ वर्षाच्या संसारात मी अत्यंत समाधानी आहे. मला माझ्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी मिळणारे पाठबळ, मुलांना घडविण्यासाठी मिळालेली साथ आणि संसाराचे क्षितीज मोठे करण्यासाठी मिळालेली संगत ही गोष्ट माझ्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. माझ्या दोन्ही मुली स्वत:च्या पायावरती सक्षमपणे चालण्याच्या दृष्टीने त्यांची वाटचाल आहे. सायलीचा नुकताच विवाह झाला असून जावई अजिंक्य बुटे हे अभियंता आहेत. हर्षवर्धन दहावीचे शिक्षण घेत असून तोही आपल्या मोठ्या बहिणींच्या पावलावर पाऊल टाकत वाटचाल करत आहे. एकंदरीत नवसाचा नवरा चांगला भेटला की आयुष्य कसं मजेत जातं हे माझ्या उदाहरणावरून मी सांगू इच्छिते..!

**...ॲड.सौ.अपर्णा पद्माळे-शिंदे**

# देशातील आगळ्या-वेगळ्या मंदिराच्या संवर्धनाची गरज

प्रासंगिक



सोलापूर जिल्ह्याचे आराध्यदैवत म्हणून करमाळ्याच्या कमलादेवीची ओळख आहे. १७ व्या शतकात हेमाडपंथी स्वरूपाचे राजेरावरंभा निंबाळकरांनी बांधकाम केलेले मंदिर हे महाराष्ट्रात नव्हेतर देशात आगळ्या-वेगळ्या कलाकृतीचे अतिशय सुबक व सुंदर मंदिर आहे. अत्यंत आखीव-रेखीव असे हे मंदिर ९६ खांबावर उभे असून ९६ ओवऱ्या, शिखरावर ९६ चित्रे, गोपुराला ९६ पायऱ्या, विहिरीला ९६ पायऱ्या अशा वेगवेगळ्या ठिकाणी ९६ चे यमक साधत अत्यंत आकर्षक असे हे मंदिर आहे. मंदिरात आल्यानंतर भाविकाला अत्यंत प्रसन्न वाटते, त्याचबरोबर मनातील चिंता नष्ट करणारे हे एक मंदिर आहे. साधारणत: साडेतीनशे वर्षाच्या कालावधीनंतर या मंदिराच्या काही भागाला तडे जावू लागले आहेत. त्यामुळे श्री जगदंबा कमलादेवी देवस्थानचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी या कमलादेवी मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचे ठरवले आहे. विशेष म्हणजे यासाठी त्यांनी नाशिक येथील वास्तुविशारद वरूण भांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली या मंदिराच्या संवर्धनाचे काम हाती घेतले आहे. यासाठी जवळपास ५ कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. करमाळा तालुका व जिल्ह्यातील भाविकांनी या कार्यासाठी सढळ हाताने मदत करावी; असे त्यांनी आवाहन केले आहे. मंदिराला देणगी देणाऱ्यास ८० जी खाली आयकर विभागाकडून सवलत मिळणार आहे. ज्यांना मदत करायची आहे त्यांनी ९४०४७०८९२४ किंवा ९४०४२९८७८१ या क्रमांकाशी संपर्क करून सहकार्य करावे.

आज आपण जे सहकार्य करत आहोत ते पुढील दहा पिढ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे व आपली देणगी ही पवित्र कार्यासाठी उपयुक्त होणार असल्याने सर्वांनी जमेल तशी मदत करावी हीच अपेक्षा !

# कर्मयोगी गोविंदबापूंच्या आदर्शवत विचारांचा वारसा पतसंस्था पुढे चालवत आहे : प्रा.अर्जुन सरक



करमाळा(सं.प्र.) : कर्मयोगी गोविंदबापूंच्या आदर्शवत विचारांचा पतसंस्था पुढे चालवत आहे; असे प्रतिपादन पाटील गटाचे प्रवक्ते प्रा.अर्जुन सरक यांनी केले.

जेऊर येथील कर्मयोगी गोविंदबापू पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रा.सरक बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन संजयकुमार गादीया हे होते तर व्यासपीठावर व्हा.चेअरमन मुबारक शेख, संचालक सुनील शहाणे, नवीनकुमार दोशी, कांबळे सर, शितलकुमार दोशी, अर्जुन पांढरे, संस्था सचिव अनिल पाटील यांचेसह लोकनेते नारायण पाटील पतसंस्थेचे सचिव विलास ठोकळ, माजी सरपंच भास्कर कांडेकर, सोसायटी अध्यक्ष महेश कांडेकर, माजी उपसरपंच धनाजी शिरस्कर, साडे येथील शेलार सर, करमाळा तालुका माध्य.शिक्षक पतसंस्थेचे सचिव पांडूरंग वाघमारे, सुनील तळेकर आदी मान्यवर उपस्थित होते. सभेच्या सुरूवातीस कर्मयोगी गोविंदबापू पाटील व मोतीकाका गादीया यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अहवाल वाचन व प्रास्ताविक व्यवस्थापक शांताराम सुतार यांनी केले. यावेळी

> कर्मयोगी गोविंदबापू पाटील पतसंस्थेत दहा कोटीहून अधिक ठेव असून, पाच कोटीहून अधिक कर्जवाटप पतसंस्थेकडून करण्यात आले आहे. पुढील आर्थिक वर्षात पतसंस्थेत १५ कोटीहून अधिक ठेव असेल व कर्जवाटप प्रमाण वाढवले जाईल. सभासदांना चांगला लाभांश व ठेवीदारांना चांगले व्याज देऊन छोट्या व्यावसायिकांना कमी व्याजदरात तात्काळ कर्ज देण्याचा आपला मानस आहे.
>
> **...संजयकुमार गादीया(चेअरमन)**

त्यांनी पतसंस्थेचा लेखाजोखा सभासदांसमोर मांडला. विलास ठोकळ यांनी पतसंस्था कशी चालवावी याबद्दल मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन अंगद पठाडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार व्हा.चेअरमन मुबारक शेख यांनी मानले. यावेळी उपस्थित सभासदांमधून पाच सभासदांना लकी ड्रॉ काढून उपस्थितीबद्दल आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. तसेच सभासदांना सोलापुरी चादर भेट देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिपीक सोमनाथ वाघमोडे, कुलदीप जाधव, अतुल गादीया यांनी परिश्रम घेतले.

# ईद-ए-मिलाद निमित्त ७ ऑक्टोबरला लेजर खतना शिबीर

करमाळा(सं.प्र.) : ईद-ए-मिलाद निमित्त बहुजन विकास संस्था करमाळा यांचे वतीने शनिवार, ७ ऑक्टोबरला सकाळी नऊ ते पाच या वेळेत नालबंद मंगल कार्यालय, अहमदनगर रोड, करमाळा येथे लेजर खतना शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरात सोलापूरचे सुप्रसिध्द खतना स्पेशालिस्ट हाजी डॉ.नासीर सय्यद हे उपस्थित राहून आलेल्या लहान मुलांची लेजरद्वारे खतना करणार आहेत.

या शिबीराचे उद्घाटन ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे तालुका अध्यक्ष ॲड.नईम हाजी कलीम काझी यांचे हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून काझी सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष शफीभाई काझी, करमाळा तहसील कार्यालयीन महसुल सहाय्यक जेलर जमीर पटेल, तसेच हयात मेडिकल अहमदनगर चे आदिल याकुब शेख, दौंडचे माजी नगराध्यक्ष बादशाहभाई शेख, हाजी कलीम काझी सर, भूमचे सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षक दस्तगीर पठाण, डॉ.सादीक बागवान, डॉ.अस्लम अंगरशा, विमा प्रतिनिधी रज्जाक पठाण, हाजी सादीक काझी, माजीद काझी, माजी उपनगराध्यक्ष अहमद चाचा कुरेशी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या शिबीरात करमाळा शहरातील हाजयात्रेकरू व गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. या शिबीरात मुस्लिम बांधवांनी आपल्या पाल्यांच्या नांवनोंदणीसाठी कय्युम शेख (८६००६१७७६२), इन्नुस पठाण (८४८४००५५८४), जमीर शेख (७५८८०२०७८६), शौकत शेख (९१०७८६७७८६), अकील सय्यद (९६२३२४ १३३३), तौफिक शेख (९४२०७८६९००) येथे संपर्क साधावा; असे आवाहन बहुजन विकास संस्थेचे अध्यक्ष व शिबीराचे आयोजक इसाक पठाण व संयोजक हाजी समीर शेख व अकबर (पप्पु) सय्यद यांनी केले आहे.

प्रवेश !! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश !!
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)
टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे
किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

# उमरड शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी संजय कोठावळे

करमाळा(सं.प्र.): उमरड जि.प. शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी संजय कोठावळे यांची निवड करण्यात आली.

शाळा व्यवस्थापन समिती कार्यकरिणी निवडीची बैठक नुकतीच पार पडली. त्यावेळी कोठावळे यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष पदी चांगदेव चौधरी तर सदस्य म्हणून रविंद्र गिरी, इंद्रजीत बदे यांची तर महिला प्रतिनिधी म्हणून भारती महेंद्र पाखरे, हिना फिरोज पठाण, संजीवनी भीमराव कोंडलकर, सीमा बंकट बदे, प्रियंका प्रमोद पडवळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. स्थानिक प्राधिकरण सदस्य म्हणून ग्रा.पं.सदस्य समाधान वलटे यांची तर शिक्षणतज्ञ म्हणून जनार्दन मारकड यांची निवड करण्यात आली. या निवडीप्रसंगी सरपंच लालासाहेब पडवळे, माजी सरपंच प्रमोद बदे, बापूराव चोरमले, उपसरपंच गणेश चौधरी, मुकेश बदे, संदिप बदे, पोलीस पाटील अंकुश कोठावळे, समाधान मारकड, भगवान चौधरी, चांगदेव चौधरी यांचेसह ग्रा.पं.सदस्य, सोसायटी सदस्य व पालक उपस्थित होते. सदरच्या निवडी बिनविरोध पार पडल्याबद्दल मुख्याध्यापक सिताराम भिल यांनी सर्वांचे आभार मानले. शाळा व्यवस्थापन समितीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान ग्रामपंचायत व शाळेच्या वतीने करण्यात आला.

# भोसे ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी अमृता सुरवसे

करमाळा(सं.प्र.): भोसे ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी अमृता प्रितम सुरवसे यांची बिनविरोध निवड झाली आहे. यापूर्वी अमृता सुरवसे या ग्रामपंचायतीच्या उपसरपंच होत्या. मधल्या कालावधीमध्ये त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर कविता हनुमंत वारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली होती. तर सध्या सरपंच असणारे डॉ.प्रा.दिपक सुरवसे यांनी पार्टी अंतर्गत निर्णयानुसार राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदी अमृता प्रितम सुरवसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सर्कल राऊत यांनी काम पाहिले. यावेळी उपसरपंच कविता वारे, माजी सरपंच व सदस्य डॉ.प्रा.दिपक सुरवसे, सदस्या रूपाली भारत सुरवसे यांचेसह माजी सरपंच भोजराज सुरवसे, वनमाला सुरवसे, सेवानिवृत्त सेल्स टॅक्स असिस्टंट कमिशनर अरूणराव पाटील, माजी उपसरपंच व साडे हायस्कुलचे माजी मुख्याध्यापक एन.डी.सुरवसे, माजी उपसरपंच जयंत वारे, कुंडलिक सुरवसे, मेजर विष्णू खेडकर, आरटीओ प्रतिनिधी विकास रोडगे, हनुमंत वारे, प्रितम सुरवसे, उत्तम सुरवसे, बबनभाऊ सुरवसे, भारत सुरवसे, कॉन्ट्रॅक्टर संजय सुरवसे, ग्रामसेवक राम बडे, गौतम वारे, श्रीधर वारे, मोहन वारे, शंकर घनवट, विजय रोडगे, संतोष खेडकर, मधुकर चव्हाण, गोविंद सुरवसे, अमोल सुरवसे, बाळासाहेब सुरवसे आदीजण उपस्थित होते.

नूतन सरपंच अमृता सुरवसे यांचा सत्कार उपसरपंच कविता वारे यांचे हस्ते करण्यात आला. उपस्थितांचे सत्कार करण्यात आले. सरपंच



अमृता यांचे पिताश्री जयंत गीते यांनीही आपल्या सरपंच मुलीला सन्मानित केले. सरपंच निवडीनंतर फटाक्यांची आताषबाजी आणि गुलालाची उधळण करण्यात आली. आ.संजयमामा शिंदे, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल, हमाल पंचायतीचे अध्यक्ष ॲड.राहुल सावंत, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष डॉ.ॲड.बाबूराव हिरडे, प्रतिष्ठीत व्यापारी अशोक दोशी, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब सावंत, उद्योजक रामभाऊ जगदाळे यांनी फोनद्वारे संपर्क साधून सरपंच अमृता सुरवसे व उपसरपंच कविता वारे यांचे अभिनंदन केले.

भोसे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू; असे आश्वासन सरपंच अमृता सुरवसे यांनी सत्काराला उत्तर देताना दिले.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
Ambuja Cement
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.


नूतन संचालक
नूतन संचालक
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदी माजी आमदार श्री.जयवंतराव जगताप, युवा नेते श्री.शंभुराजे जगताप यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल व सर्व बिनविरोध निवडलेल्या संचालकांचे...
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
• ॲड.कमलाकर वीर (माजी उपनगराध्यक्ष)
• रमेश(भाऊ) वीर • अरूण(काका) जगताप
वीर व जगताप परिवार, करमाळा.


करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदी माजी आमदार श्री.जयवंतराव जगताप, युवा नेते श्री.शंभुराजे जगताप, श्री.मनोज पितळे श्री.परेशकुमार दोशी यांची निवड झाल्याबद्दल व सर्व बिनविरोध निवडलेल्या संचालकांचे हार्दिक अभिनंदन !
नूतन संचालक
नूतन संचालक
नूतन संचालक
नूतन संचालक
शुभेच्छुक
करमाळा भुसार व्यापारी असो;
करमाळा, जि.सोलापूर


नूतन संचालक
देशभक्त
मा.नगराध्यक्ष
मा.उपनगराध्यक्ष
नूतन संचालक
आमच्या संस्थेचे आधारस्तंभ व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप
चेअरमन श्री.शंभुराजे जगताप, व्हा.चेअरमन श्री.जनार्धन नलवडे व श्री.रामदास गुंडगिरे यांची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
नूतन संचालक
शुभेच्छुक
नूतन संचालक
करमाळा तालुका को.ऑप. ॲग्री परचेस ॲन्ड सेल युनियन लि; करमाळा.
श्री.शिवाजी काळे
श्री.दादासाहेब पुजारी
श्री.विठ्ठल तोरणे (मॅनेजर)
सर्व कर्मचारी वृंद, करमाळा.
श्री.जनार्धन नलवडे
श्री.रामदास गुंडगिरे


अध्यक्ष
उपाध्यक्ष
जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, वीट या शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी श्री.अनिल बाबासाहेब ढेरे यांची तर उपाध्यक्ष पदी श्री.योगेश चांदणे यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
• समस्त ग्रामस्थ, वीट
• जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, वीट


AP
Interior
Build Your...
Dream Home With us !
आता आपल्या
स्वप्नातील घर
बनविणे झाले अगदी सोपे !
आपण फक्त आमच्यावर जबाबदारी सोपवा आणि चिंतामुक्त व्हा !!
करमाळा शहरात आपल्या सेवेसाठी सर्व अत्याधुनिक सुविधांसह.. आपल्या ऑफिसेस, फ्लॅट शॉपचे इंटेरिअर करून मिळेल.
2D, 3D डिझाईन
• स्टार्ट टू एन्ड फुल सर्व्हिस
• तयार होणाऱ्या कामाचे व्हिडीओ काम होण्यापूर्वी पहायला मिळतील.
• सर्व काम अचुक व वेळेत पूर्ण होण्याची हमी
संपर्क
ऐश्वर्या सागरसिंग परदेशी
महेंद्रनगर, गायकवाड चौक, करमाळा.
Mob.7796473756
9423333939, 9881174828
9890407830
श्री गणेश प्लाय ॲन्ड ग्लास(परदेशी फर्निचर), महेंद्रनगर, करमाळा.



प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा
राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार'
श्री.पोपट गणपत शेळके सर यांना प्राप्त झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
शेळके क्लासेस, करमाळा.
• १९८२ पासूनची मुंबईपासून गुणवंत विद्यार्थी घडविण्याची उत्कृष्ट परंपरा
• इ.५ वी ते इ.१० वी (गणित व विज्ञान) क्लासेस
पत्ता :विठ्ठल हॉस्पिटलच्या वरती, श्री कमलादेवी रोड,
दोशी पेट्रोलपंपाच्या समोर, करमाळा., जि.सोलापूर. मो.७०२८९६२८००


### श्री गणेश व्यापारी मंडळा तर्फे गणेशोत्सव विविध कार्यक्रमाने साजरा

# रांगोळी स्पर्धेत प्रतिभा श्रीवास्तव प्रथम बक्षीसाच्या मानकरी







करमाळा(सं.प्र.) : श्री गणेश व्यापारी मंडळ मेनरोड यांचे तर्फे आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धेत प्रतिभा आदित्य श्रीवास्तव यांचा प्रथम क्रमांक आला आहे. त्यांना सोन्याची नथ हे प्रथम बक्षीस मिळाले असून, हे बक्षीस ओंकार गोल्ड पॅलेस यांचे तर्फे देण्यात आले आहे.

श्री गणेश व्यापारी मंडळा तर्फे यावर्षीचा गणेशोत्सव विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. गणरायाचे आगमनही पारंपारिक पध्दतीने पालखी सोहळ्याने केले होते. यावेळी आयोजित केलेल्या स्पर्धेसाठी स्पॉन्सरशीप पध्दत अवलंबली होती. या उपक्रमास व्यापाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. गणेश जयंती दिवशी या मंडळा मार्फत श्रीराम प्रतिष्ठान यांचे चालविल्या जाणाऱ्या उपक्रमातील निराधार लोकांना भोजन देण्यात आले. गणपती विसर्जनाचा खर्च टाळून या खर्चातून मंडळ वृक्षारोपणाचा कार्यक्रम करते. यावर्षी रांगोळी स्पर्धा मोठ्या प्रमाणात घेण्यात आली. या स्पर्धेत श्रीवास्तव यांचा प्रथम तर द्वितीय क्रमांक पल्लवी गणेश सातपुते यांचा आला असून त्यांना यश कलेक्शन द्वारे पैठणी साडी हे बक्षीस मिळाले आहे. तृतीय क्रमांक सेजल राजेंद्र कटारिया यांना मिळाला असून त्यांना अजय प्रिंटींग प्रेस यांचे मार्फत डिनरसेट हे बक्षीस मिळाले आहे. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे यांचे हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अश्विनी राजकुमार दोशी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, पत्रकार दत्तात्रय पाखरे उपस्थित होते. स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून अनघा संतोष गांधी (पुणे) यांनी काम पाहिले. उपस्थितांचे स्वागत मंडळाचे अध्यक्ष ओम चिवटे, उपाध्यक्ष ओंकार ढाळे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अभिषेक देवी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रितम लुंकड, सागर पटवा, रोहित ढाळवाले, लक्ष्मीकांत ठोंबरे, स्नेहल कटारिया, अभिनव देवी, रामा वाघमारे, दर्पण ढाळवाले, विशाल भिंगारे, केवल दोशी, ब्रिजेश देवी, संकेत पुराणिक, रोहित चिवटे, शैलेश राजमाने, अभिजीत वार्शिबेकर, अजिंक्य गुगळे, भावेश देवी,ओंकार भुसारे, हर्ष शहा, कुणाल ढाळवाले, महेशशेठ किंगर, विशाल कटारिया, तिलक देवी, चेतन दुगम, राकेश दोशी, मयुर दोशी यांनी परिश्रम घेतले. मंडळाच्या उपक्रमाचे पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे यांनी कौतूक करून गणेश व्यापारी मंडळाप्रमाणे अन्य मंडळांनी सामाजिक उपक्रम राबवावेत; असे आवाहन केले.


नूतन सरपंच



आशिर्वाद
मार्गदर्शक
मा.चेअरमन, मकाई कारखाना
मा.सदस्य, पं.स.



माजी मुख्याध्यापक
माजी सरपंच
खंबीर साथ



श्री.एन.डी.सुरवसे सर
(साडे हायस्कुल साडे)
श्री.भोजराज सुरवसे
अध्यक्ष,रा.काँ.विधानसभा मतदार संघ करमाळा-माढा
श्री.हनुमंत वारे

नूतन उपसरपंच



भोसे ग्रामपंचायतीच्या नूतन सरपंच पदी
सौ.अमृता प्रितम सुरवसे यांची तर उपसरपंच पदी
सौ.कविता हनुमंत वारे यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !

ग्रामपंचायत सदस्य : प्रा.दिपक सुरवसे, सौ.रूपाली सुरवसे, श्री.नवनाथ बागडे

शुभेच्छुक भोसे ग्रामपंचायत व ग्रामस्थ



श्री.प्रितम निवृत्ती सुरवसे

## शिक्षण व आरक्षणाच्या समस्या व निवारणाबाबत
# प्रा.रामदास झोळ यांनी घेतली शरद पवार यांची भेट



करमाळा(सं.प्र.) : राज्यातील शिक्षण व आरक्षणाच्या समस्या व निवारणाबाबत दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी देशाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली तसेच निवेदनही दिले.

या भेटी दरम्यान प्रा.रामदास झोळ यांनी शिक्षणाबाबती मध्ये बारावीनंतर च्या सर्व खाजगी विद्यापीठे व इतर महाविद्यालयांसी प्रवेशाची अंतिम तारीख एकच करणे, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया एकसारखी करणे, प्रवेश परीक्षांची संख्या कमी करणे, समुपदेशन फेरी पुन्हा सुरू करणे इ. बाबत सखोल चर्चा केली. तसेच राज्यातील ग्रामीण भागातील व्यावसायिक महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुसूचित जाती व जमाती तसेच धनगर समाजातील विद्यार्थ्यांना स्वयंम व स्वधार योजनेचा लाभ मिळावा. त्याचबरोबर इतर समाज बांधवांप्रमाणे आरक्षणाशिवाय मराठा समाजातील युवकांना देता येऊ शकणाऱ्या शैक्षणिक व इतर सवलतीबाबत शरदचंद्रजी पवार साहेब यांच्याशी प्रा.झोळ यांनी चर्चा केली.

यावेळी शरद पवार यांनी प्रा.झोळ यांचेशी केलेल्या चर्चादरम्यान वरील सर्व मागण्यांची पूर्तता करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू; असे आश्वासन दिले.

# रनिंग व गोळा फेक स्पर्धेत वेदांत कानडे याचे सुयश



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील महात्मा गांधी विद्यालयातील विद्यार्थी वेदांत कानडे याने १४ वर्षे वयोगटातील जिल्हास्तरीय मैदानी रनिंग स्पर्धा व गोळा फेक स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. ही स्पर्धा अक्कलकोट येथे पार पडली. संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, विश्वस्त शंभुराजे जगताप, वैभवराजे जगताप, प्रभारी मुख्याध्यापक बागवान सर, ज्येष्ठ पर्यवेक्षक बी.के.पाटील, पर्यवेक्षिका सौ.नवले, ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख पवार सर यांनी वेदांत कानडे यांचे विशेष अभिनंदन केले. वेदांत कानडे यास क्रिडा शिक्षक सचिन दळवे यांचे मार्गदर्शन लाभले.

# कमलाभवानी देवीच्या रस्त्यावर गतिरोधक उभारावेत

करमाळा(सं.प्र.) : करमाळा ते कमलाभवानी मंदिर हा रस्ता अतिशय चांगला झालेला असून या रस्त्यावरून अनेक युवक वेगात वाहने चालवत आहेत. या रस्त्यावर वारंवार अपघात होत आहेत. त्यामुळे या रस्त्यावर गतिरोधक उभारण्याची गरज आहे.

हा रस्ता खूपच चांगला झालेला असल्याने अनेक युवक सुसाट वेगात दुचाकी वाहने चालवत आहेत. प्रशासनास वारंवार कळवूनही या रस्त्यावर गतिरोधक उभारले जात नाहीत. गणेशोत्सवात अनेक वाहनांचे अपघात झालेले आहेत. आगामी नवरात्रोत्सवात भाविकांची मोठी गर्दी असते. त्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी या रस्त्यावर गतिरोधक उभारावेत

**....रमेश कवडे (माजी मुख्याध्यापक)**

# आदिनाथच्या पंपावरून डिझेल विक्री सुरू



करमाळा(सं.प्र.) : आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या डिझेल पंपावरून सभासदांसाठी डिझेल विक्री सुरू झाली असून याचा फायदा सभासदांनी घ्यावा; असे आवाहन पत्रकार संघाचे सहसचिव अशपाक सय्यद यांनी केले आहे.

आदिनाथ कारखान्याच्या कार्यस्थळा वरून डिझेल विक्रीचा शुभारभ पत्रकार सय्यद यांचे हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत कारखान्याचे प्रशासकीय संचालक महेश चिवटे यांनी केले.पुढे बोलताना सय्यद म्हणाले, की आदिनाथ कारखाना हे सहकाराचे मंदिर असून शासनाने नियुक्त केलेले प्रशासकीय मंडळ अत्यंत पारदर्शक कारभार करत आहे. अत्यंत काटकसरीने कारभार करून त्यांनी कारखाना गाळपासाठी सज्ज केला आहे. गतवर्षीचे आदिनाथ कारखान्याने सर्व पेमेंट दिले आहे. ऊस वाहतुकदारांचे राहिलेले पेमेंट लवकरच देणार आहेत. कारखाना डिस्लरी प्रकल्प सुरू करण्यासाठी प्रशासकीय संचालक मंडळ प्रयत्न करत असल्यामुळे सभासदांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. यावर्षी आदिनाथने चार लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप करावे. यासाठी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कारखाना समजून प्रत्येकांनी कारखान्याला ऊस घालावा; असे आवाहन सय्यद यांनी केले आहे. उपस्थितांचे आभार कार्यकारी संचालक बागनवर यांनी मानले.

शेतजमीन विकणे आहे
जातेगाव येथील १५ एकर शेतजमीन योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
.... संपर्क ....
राजुभाई बागवान
मो.९८८१६३१५०२

प्रथम पुण्यस्मरण



स्व.अर्जुन नरहरी नलवडे


तो हसरा चेहरा...
नाही कोणाला दुखावले,
मनाचा तो भोळेपणा...
कधी नाही केला मोठेपणा,
उडूनी गेला अचानक प्राण...
पुनर्जन्म घ्यावा तुम्ही आमच्यासाठी
हीच आमची प्रार्थना !

स्व.अर्जुन नरहरी नलवडे यांचे
॥ प्रथम वर्षश्राध्द ॥
मित्ती भाद्रपद कृष्ण ७ शके १९४५
गुरूवार दि.५/१०/२०२३ रोजी दुपारी १२ वा. ०५ मि.
करण्याचे योजिले आहे. तरी पुण्यमुर्तीस पुष्पांजली
वाहण्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !
आपले नम्र
श्री.आप्पाराव नरहरी नलवडे, श्री.अमरजीत अर्जुन नलवडे
सौ.अमृता शितल बारकुंड, सौ.अनुजा विशाल थोरात, सौ.अस्मिता प्रशांत कोकाटे
सौ.सुप्रिया मनोज लोंढे व समस्त नलवडे परिवार
स्थळ : चिखलठाण नं.१, ता.करमाळा.
टीप : सकाळी १० ते १२ युवा किर्तनकार ह.भ.प.संकेत महाराज यादव-मेरठेकर यांचे हरिकिर्तन होईल. तरी भाविक भक्तांनी याचा लाभा घ्यावा, ही नम्र विनंती !

SK's
events & management



• लग्न समारंभ
• डेकोरेशन
• जेवण व केटरर्स
• स्वागत समारंभ
• वाढदिवस
• नामकरण सोहळा
• डोहाळे कार्यक्रम
• डी.जे. व सांस्कृतिक वाद्य
• उद्घाटन समारंभ
• वास्तुशांती
• फोटोशुट
• मेकअप
• मेहंदी आर्टीस्ट
• भटजी आणि पुजा साहित्य



सर्व प्रकारच्या कार्यक्रमांचे नियोजन !
First time in Karmala
Jumbo $CO_2$ Paper Blast
सुरज: 9767803011 / 9822598682
पत्ता : राशिनपेठ, करमाळा, जि.सोलापूर.

# करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक बिनविरोध

## माजी आमदार जयवंतराव जगताप गटाची एकहाती सत्ता





करमाळा(सं.प्र.) : करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या पुढाकाराने व माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे नेतृत्वाखाली तसेच आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार नारायण पाटील व बागल गटाचे नेते दिग्विजय बागल यांचेसह अन्य राजकीय पक्ष व गटातटाच्या सहकार्याने बिनविरोध झाली आहे. या निवडीने जगताप गटात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, बाजार समितीवर माजी आमदार जयवंतराव जगताप गटाची एकहाती सत्ता प्रस्थापित झाली आहे.

बाजार समितीची निवडणूक बिनविरोध होणार म्हणून सा.कमलाभवानी संदेशने २२ सप्टेंबरच्या अंकात भाकीत वर्तविले होते. ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी मोहिते-पाटील यांची शिष्टाई कामी आली आहे. या निवडणुकीसाठी आमदार संजयमामा शिंदे यांनी बिनशर्त पाठींबा दिल्याने त्यांच्या सूचनेनुसार त्यांच्या गटाच्या कार्यकर्त्यांनी बिनशर्त उमेदवारी अर्ज मागे घेतले होते. शेवटी-शेवटी सावंत गटाचे नेते सुनील सावंत यांनी निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले होते. परंतु त्यानंतर मात्र त्यांनी आमदार संजयमामा शिंदे व माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या विनंतीस मान देऊन संस्थेच्या हितासाठी त्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी मोहिते-पाटील यांनी माजी आमदार नारायण पाटील व बागल गटाचे नेते दिग्विजय बागल, माजी आमदार जयवंतराव जगताप यांचेबरोबर बैठक घेऊन समझोता घडवून आणला. पाटील गटाला दोन व बागल गटाला दोन जागा देण्याचे ठरले. आमदार संजयमामा शिंदे यांनी बिनशर्त पाठींबा दिल्यामुळे त्यांच्या गटाला कोणतीही जागा मिळालेली नाही.

आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अतुल खुपसे-पाटील व भाजपच्या काही समर्थक उमेदवारांचे अर्ज राहिले होते. शेवटी शेवटी त्यांनीही अर्ज मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली आहे. बाजार समितीची निवडणूक ही करमाळा तालुक्याच्या अन्य निवडणुकापेक्षा आत्तापर्यंत जास्त गाजलेली निवडणूक होती. परंतु यावेळेस बिनविरोध निवडणूक झाल्याने वेगळा इतिहास घडला आहे. आत्तापर्यंतच्या बाजार समितीच्या इतिहासात अनेक निवडणूकात वादावादी किंवा न्यायालयीन संघर्ष झालेला आहे. तसेच तलवारीची लढाई होऊनही ही निवडणूक गाजली आहे. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध म्हणजे तरूण पिढीसाठी एक आदर्शाचा मार्ग असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. आत्तापर्यंतच्या निवडणुकीत मोहिते-पाटील यांच्या पाठबळामुळेच आव्हान उभे झाले होते. आज मात्र त्यांच्याच हस्तक्षेपामुळे ही निवडणूक बिनविरोध होत आहे व संपूर्ण राज्यात आदर्श असे उदाहरण आहे.

**<u>बिनविरोध निवडलेल्या उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे..</u>**

**जगताप गट :** माजी आमदार जयवंतराव जगताप, शंभुराजे जयवंतराव जगताप, जनार्दन ज्ञानदेव नलवडे, रामदास विलास गुंडगिरे, तात्यासाहेब चंद्रभान शिंदे, महादेव गोविंद कामटे, सागर भगवान दोंड, शैलेजा बबन मेहेर, साधना आण्णासाहेब पवार, शिवाजी ज्ञानदेव राखुंडे, नागनाथ गणपत लकडे, मनोज कांतीलाल पितळे, परेशकुमार रतनचंद दोशी. **माजी आमदार नारायण पाटील गट :** नवनाथ मधुकर झोळ, बाळू चंद्रकांत पवार **बागल गट :** काशिनाथ भिमराव काकडे, कुलदीप विश्वास पाटील **सावंत गट :** वालचंद विठ्ठल रोडगे

या सर्व विजयी उमेदवारांचे माजी आमदार जयवंतराव जगताप, नारायण पाटील, दिग्विजय बागल यांनी अभिनंदन केले आहे. या निवडीनंतर करमाळा शहरात जगताप गटाच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आताषबाजी करून आनंद व्यक्त केला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आबासाहेब गावडे यांनी काम पाहिले.

# करमाळा शहरात गणेशोत्सव शांततेत संपन्न



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात गणेशोत्सव शांततेत व उत्साही वातावरणात संपन्न झाला. शहरात गणरायाचे आगमनही शांततेत झाले होते. गणेश विसर्जनच्या आदल्या दिवशी अनेक मंडळांनी देखावे सादर केले होते. हे देखावे पाहण्यासाठी नागरीकांनी मोठी गर्दी केली होती. सावंतगल्ली येथील श्री छत्रपती शिवाजी तरूण मंडळाने महाराष्ट्राचा चित्ररथ, जय महाराष्ट्र मित्र मंडळाने पंढरीची वारी अर्थात विठ्ठल दर्शन, राशिनपेठ तरूण सेवा मंडळाने संत एकनाथ महाराज कथा, हिंदू खाटीक तरूण मंडळाने आराधी मंडळी, दिपक तरूण मंडळाने मराठी बाणा चलचित्र, श्री गजानन सोशल क्लबने जादूगारचा खेळ, तेली गल्ली व कानाडगल्ली येथील वाल्मिक मित्र मंडळाने जिवंत देखावे सादर केले होते. विसर्जन मिरवणुका दुपारी चार नंतर शहरातून सुरू झाल्या होत्या, रात्री बारा नंतर या मिरवणुका संपन्न झाल्या. या मिरवणुकीत सरकार मित्र मंडळ, जय महाराष्ट्र मित्र मंडळ, पैलवान ग्रुप सुमंतनगर, राशिनपेठ तरूण मंडळ, राजे ग्रुप रंभापुरा, लोकमान्य टिळक तरूण मंडळ किल्ला विभाग, फंडगल्ली तरूण मंडळाने ट्रॅक्टरवर आकर्षक असे देखावे सादर केले होते. सावंतगल्ली येथील श्री छत्रपती शिवाजी तरूण मंडळाने पारंपारीक पध्दतीने मिरवणूक काढली होती. या मिरवणुका पाहण्यासाठी प्रत्येक चौकात नागरीकांनी विशेषत: महिलांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी गणेश भक्तांना सिंधी समाज बांधव व कै.शिवाजी कांबळे यांचे स्मरणार्थ गणेश भक्तांना नाष्टा व पाण्याची सोय केली होती.


जामा मस्जिद व डॉ.एपीजे अब्दुल कलाम फाऊंडेशन यांचे तर्फे वेताळपेठ येथे जामा मस्जिद वरून मुस्लिम समाजाच्या वतीने सर्वप्रथम श्रीदेवीचामाळ येथील राजेरावरंभा तरूण मंडळाच्या श्री गणेश मिरवणुकीचे स्वागत करून पुष्पवृष्टी केली. तसेच येणाऱ्या मंडळाच्या कार्यकर्त्यांचे फेटा बांधून स्वागत केले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे, नायब तहसीलदार विजयकुमार जाधव, माजी नगराध्यक्ष युसूफ नालबंद यांचेसह विठ्ठल सावंत, सोमनाथ चिवटे, प्रशांत ढाळे, संजय सावंत, तानाजी जाधव, प्रविण कटारिया, नितीन घोलप, राजेंद्र घाडगे, बाळासाहेब क्षीरसागर, सचिन घोलप, संतोष घोलप, विजय लावंड, संतोष वारे आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमासाठी जमीर सय्यद, फारूक जमादार, उस्मान सय्यद, रमजान बेग, नासीर कबीर, सूरज शेख, युसुफ बागवान, आझाद शेख, जहांगीर बेग, मुस्तकीम पठाण, दिशान कबीर, मजहर नालबंद, अरबाज बेग यांनी परिश्रम घेतले.

# लोकनेते नारायण पाटील पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न




करमाळा(सं.प्र.) : लोकनेते नारायण(आबा) पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था जेऊर या संस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये संपन्न झाली. संस्थेचे चेअरमन धुळाभाऊ कोकरे यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज पार पडले. या सभेला व्हा.चेअरमन दत्तात्रय रणसिंग तसेच संचालक परेशकुमार दोशी, चंद्रकांत बोराडे, शिवाजी गावडे, रूक्मीणी किसन माने यांचेसह संस्थेचे सभासद, हितचिंतक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे सचिव विलास ठोकळ यांनी अहवाल वाचन करून संस्थेच्या कामकाजाबाबत व प्रगतीबाबत सविस्तर माहिती दिली. या सभेस युवा नेते पृथ्वीराज पाटील आवर्जुन उपस्थित होते. संस्थेच्या वतीने त्यांचा फेटा बांधून सत्कार करण्यात आला. संस्थेचे संचालक परेशकुमार दोशी यांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांना संस्थेचे कामकाज, ठेवी, कर्ज इ.बाबत बहुमोल मार्गदर्शन केले. व्यवस्थापक शेख यांनी उपस्थितांचे व संस्थेस सहकार्य करणारे हितचिंतक, अधिकारी वर्ग, पदाधिकारी यांचे आभार मानले. ही सभा यशस्वी होण्यासाठी कर्मचारी वर्ग, पिग्मी एजंट यांनी परिश्रम घेतले.

# भावपूर्ण श्रध्दांजली !



स्व.विजय भगवानराव खटके

आमचे मित्र **विजय भगवानराव खटके** यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे परिवाराचे दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास शांती देवो,हीच आमची प्रार्थना !

शोकाकुल

**श्री.अरूण(काका) जगताप व परिवार**

## मोटारसायकलच्या धडकेने वृध्द पायाचे हाड फॅक्चर

करमाळा(सं.प्र.) : मोटारसायकलच्या धडकेने वृध्दाच्या पायाचे हाड फॅक्चर झाले आहे. हा अपघात २७ सप्टेंबरला दुपारी अडीच वाजता जेऊर येथील बायपास रोडवर निराळेबाबा मॉल समोर घडला आहे.

या प्रकरणी दशरथ भिवा मस्कर (वय-७२, रा.वरकटणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी पंढरपूर येथे दर्शनासाठी गेलो होतो. त्यावेळी पंढरपूर-नाशिक एस.टी.ने एसटीने मला निराळेबाबा मॉलसमोर दुपारी अडीच वाजता सोडले. त्यावेळी मी वरकटणे येथे जाण्यासाठी रोड क्रॉस करून जात असताना एक काळ्या रंगाची मोटारसायकल वेगात आली व त्याने मला धडक देऊन खाली पाडले. त्यावेळी माझ्या डाव्या पायाच्या पिंडरीला मोटारसायकलचे फुटरेस्ट लागून पायाचे हाड मोडले आहे. या पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## वाळूचा ट्रॅक्टर पोलीसांना पकडून देतो काय म्हणत बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : वाळूचा ट्रॅक्टर पोलीसांना पकडून देतो काय असे म्हणत घरातील एक तरूणास दुसऱ्या तरूणाने बेदम मारहाण करून घराचा पत्रा उचकटून नुकसान केले आहे. हा प्रकार २४ सप्टेंबरला दुपारी पावणेतीन वाजता आवाटी येथे घडला आहे.

या प्रकरणी तानसेन जनार्दन खांडेकर(वय-२५, रा.आवाटी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २४ सप्टेंबरला दुपारी पावणेतीन वाजता मी माझ्या घरात बसलो असताना आझम सलीमखान शेख हा घरात आला व तु माझा मामा ताहेर जाफर खान यांचा वाळूचा ट्रॅक्टर पोलीसांना का पकडून दिला.. असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केली. तसेच घराचे पत्रे उचकटून नुकसान केले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहूरकर हे करत आहेत.

## दारू पिऊन मोटारसायकल चालविणाऱ्याविरूध्द कारवाई

करमाळा (सं.प्र.): दारू पिऊन कमलादेवीच्या रस्त्यावरून मोटारसायकल चालविणाऱ्या तरूणा विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार २७ सप्टेंबरला दुपारी साडेबारा वाजता झाला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दिपक नागनाथ कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २७ सप्टेंबरला दुपारी साडेबाराच्या सुमारास कमलादेवीच्या रोडवर वाहतूक नियमन करीत असताना बबन आण्णा ठोसर (वय-३०, रा.करंजे) हा मोटारसायकल क्र.एमएच १४ एसएम ६४१० हे वेडीवाकडी चालवत आला. त्याला थांबवून त्याची चौकशी केली असता, त्याचा दारू पिण्याला संशय आला. त्यानंतर त्याची ब्रेथ अनालायझर मशीनद्वारे तपासणी केली असता तो दारू पिल्याचे सिध्द झाले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## लाच स्वीकारताना परिरक्षण भूमापक रेंगडे चतुर्भूज

### करमाळा भुमी अभिलेख कार्यालयात अँन्टी करप्शनची कारवाई

करमाळा(सं.प्र.) : येथील भुमी अभिलेख कार्यालयातील परिरक्षण भूमापक (वर्ग-३) खंडू मारूती रेंगडे याला अडीच हजार रूपयांची लाच स्वीकारताना सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडून अटक केली आहे. तक्रारदाराने त्याच्या मोरवड हद्दीतील जमिनीची मोजणी करून हद्दी निश्चित करणे व हद्दी निश्चित केल्यानंतर त्याची नकाशा प्रिंट काढण्यासाठी तातडीच्या मोजणीसाठी अर्ज केला होता. त्यासाठी आवश्यक असलेली शासकीय तीन हजार रूपये फी चलनाद्वारे भरली होती. तरी देखील परिरक्षण भूमापक खंडू रेंगडे याने मोजणी करून हद्द कायम करणे व नकाशा प्रिंट काढण्यासाठी तक्रारदाराकडे तीन हजार रूपयांची लाच मागितली. तडजोडीअंती अडीच हजार रू. देण्याचे निश्चित झाले. त्यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांच्याकडे तक्रार केली. या तक्रारीच्या अनुषंगाने २५ सप्टेंबरला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून खंडू रेंगडे यास अडीच हजार रूपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. याबाबत करमाळा पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असून, ही कारवाई पोलीस उपअधिक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी, पोलीस अंमलदार प्रमोद पकाले, हवालदार गजानन किणगी, श्याम सुरवसे यांनी केली आहे.

## केम येथे हातभट्टी दारू विक्री करणाऱ्यावर पोलीस कारवाई

करमाळा(सं.प्र.) : केम येथे ग्रामपंचायतीच्या बाजुला हातभट्टी दारू विक्री करणाऱ्यावर पोलीसांनी कारवाई केली आहे. हा प्रकार २७ सप्टेंबरला दुपारी साडेतीन वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल मयुर नागेश कदम यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की केम येथील ग्रामपंचायतीच्या पाठीमागे हातभट्टी दारू विक्री होत असल्याची माहिती समजल्यावर मी तेथे गेलो असता भैरु पांडूरंग कुरडे हा दारू विक्री करताना आढळून आला. त्यामध्ये १२लिटर हातभट्टी दारू सापडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## पोलीस केस मागे का घेत नाही म्हणून काठीने मारून झाडाला बांधले

करमाळा(सं.प्र.) : पोलीस केस मागे का घेत नाही या कारणावरून चौघा जणांनी एकास काठीने मारून झाडाला बांधून ठेवले व बळजबरीने खिशातील २५०० रू. काढून घेतले. अखेर पोलीस आल्यानंतरच या प्रौढाची सुटका झाली आहे. हा प्रकार २७ सप्टेंबरला दुपारी दोन वाजता केडगाव येथे घडला आहे. या प्रकरणी रेण्या पवन्या काळे (रा.केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की चिखलठाण वरून मी एसटीने केडगाव येथे आलो असता, स्टॅन्डवर भाऊ पंढऱ्या, त्याची बायको सुधाबाई, मुलगा शिरक्या व जावई आशा पवार असे चौघेजण होते. त्यावेळी सुधाबाई हिने मला पाहून शिवीगाळ सुरू केली व पोलीसात दिलेली तक्रार मागे का घेत नाही म्हणून मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यानंतर या चौघांनी मला मारहाण करत त्यांचे वस्तीवर नेले व हातपाय बांधून काठीने पाठीवर व पायावर मारहाण केली व झाडाला बांधून टाकले व पोलीसांना याने बलात्कार केला अशी तक्रार दिली. त्यावेळी या लोकांनी माझ्या खिशातील अडीच हजार रू. बळजबरीने काढून घेतले. साडेसहा वाजता पोलीसगाडी आली तोपर्यंत त्यांनी मला झाडाला बांधून ठेवले होते. पोलीसांनी त्यांच्या तावडीतून माझी सुटका करून मला दवाखान्यात नेले. या प्रकरणी पोलीसांनी या चौघांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## आळसुंदे येथे देशी-विदेशी दारू विक्रेत्यावर गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : आळसुंदे येथे जय तुळजाभवानी हॉटेलच्या मागे लक्ष्मण संभाजी मोगल रा.सालसे हा २७ सप्टेंबला सायंकाळी साडेनऊ वाजता देशी-विदेशी दरू विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडे संत्रा कंपनीच्या १०५० रूपयाच्या १७ इम्पेरियर ब्लूकंपनीच्या ४९० रूपयाचा चार सीलबंद बाटल्या आढळून आल्या आहेत. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## बेकायदेशीर देशीदारू विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.): बेकायदेशीररित्या देशीदारू निमगाव(ह) येथे विक्री करणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल विनायक नवनाथ घोरपडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की निमगाव(ह) येथे बेकायदेशीर दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यावर तेथे गेलो असता, विशाल आण्णा जाधव हा देशीदारू विक्री करताना आढळून आला. त्याचेकडे संत्रा कंपनीच्या ९८० रूपयाच्या १५ बाटल्या सापडल्या आहेत. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. निमगाव (ह) येथेच विश्वनाथ सदाशिव साळवे (वय-६५) हेही बेकायदेशी दारू विक्री करताना आढळून आला असून त्याचेकडे संत्रा कंपनीच्या ११९० रू. च्या १७ बाटल्या सापडल्या आहेत.

सा.संदेश वा.वर्गणी २०० रू.

### वीट जि.प.शाळा व्यवस्थापन समितीच्या

## अध्यक्ष पदी अनिल ढेरे, उपाध्यक्ष पदी योगेश चांदणे

करमाळा(सं.प्र.) : वीट जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी अनिल ढेरे यांची तर उपाध्यक्ष पदी योगेश चांदणे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्य पदी नितीन धाकतोडे, मारूती जाधव, रेखा श्रीराम भोरे, रुपाली जालिंदर जाधव, खंडू जाधव, सचिन ढेरे, सुनिता सुनील ढेरे, वैशाली मच्छिंद्र जाधव, अश्विनी चंद्रकांत जगदाळे, रणजित यशवंत निंबाळकर, अरविंद जाधव यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर अध्यक्ष




अनिल ढेरे व उपाध्यक्ष योगेश चांदणे यांचा सत्कार वीट ग्रामस्थ व जि.प.शाळा वीट तर्फे करण्यात आला.

हॉटेल भाड्याने देणे आहे
धर्मसंगीत लॉन्स मंगल कार्यालय शेजारी
नागनाथ महाराज मंदिर जवळ, करमाळा-कर्जत रोड,
करमाळा येथील हॉटेल भाड्याने देणे आहे.
संपर्क : धर्मराज जनार्दन आवटे
मो.9822600663, 8888832011

गाळे भाड्याने देणे आहे
करमाळा-नगर हायवे टच असलेले शेलगाव(वांगी) येथील
पाच गाळे भाड्याने देणे आहे.
संपर्क : किशोरी राजेश चावरे, करमाळा.(मो.8605617844)


माजी आमदार
पश्चिम भागाचे नेते
सोलापूर जिल्ह्याचे नेते
करमाळा कृषी उत्पन्न बाजार
समितीच्या निवडणुकीत
माजी आमदार नारायण(आबा) पाटील
गटाचे कट्टर समर्थक
मा.श्री.नवनाथ(बापू) झोळ
यांची संचालक पदी बिनविरोध
निवड झाल्याबद्दल तसेच विजयी
सर्व संचालकांचे
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
मा.आ.नारायण(आबा) पाटील समर्थक
करमाळा-माढा मतदार संघ


देशभक्त
माजी आमदार
नूतन संचालक
नूतन संचालक
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदी माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप तसेच आमचे मित्र
मा.श्री.मनोज पितळे, मा.श्री.परेशकुमार दोशी यांची
बिनविरोध निवड झाल्याबद्दल
तसेच सर्व नूतन संचालकांचे...
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
अमोदशेठ दि. संचेती, संजय कां. कटारिया, दिपक कां. कटारिया, डॉ.राजेश चं. मेहता, विजय र. दोशी
गिरीष प्रे. दोशी, सुनील ह. लुणिया, नितीन पा. दोशी, सुधीर पु. घोडके, इकबाल मो. खान, मनोज हि. गांधी